### मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजांचा

# पत्नी-प्रेम-पराग

# प्रियप्रेमोन्मादः







## श्रीगुलाबरावमहाराज : जीवन

(इ.स.१८८१ ते १९१५)

''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''

प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज म्हणजे विदर्भातील माधानचे गुलाब गुंडोजी मोहोड. चवथ्या महिन्यात नेत्रहीन, माधान-खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे ! अशी सर्वतः विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेल्या ग्रंथलेखनरूप ज्ञानयज्ञाचे कार्य अजोड आहे.

श्रीमहाराजांची श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभक्ती असल्यामुळे ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.

श्रीमहाराजांनी ''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय'' प्रवृत्त केला.हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.

संतांची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली.

भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सद्दिानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे.तो ज्ञानानेही नाश पावत नाही, यासाठी अगदी नवीन शब्दयोजना सुचवून शंकराचार्यांच्या अद्वैतात





'अनध्यस्तविवर्त' या भक्ति-संकल्पनेचे नवे योगदान दिले.

जगातील सर्व धर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा सर्वधर्मसमन्वयाचा मूलगामी सिद्धान्त जगापुढे मांडला. आणि आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उत्तर-दक्षिण, इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्यासाठी समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतांच्या हाती दिले.

* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोतेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* समन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या कुण्डलिनी-चक्रे-नाड्यांसंबंधी चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.





* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्वमीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञानांची भारतीय सिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.
* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन.त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तुलना आणि मानसायुर्वेदाची निर्मिती.
* इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादांसंबंधी तौलनिक विवेचन.
* बुवाबाजीचा दंभस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.

# सौ. मनकरणिका आई

सौ.मनकर्णिका-आईंनी पाळलेला पत्नीधर्म व शिष्यधर्म त्यांस अत्यंत भूषणावह असून इतरांस परम अनुकरणीय आहे. वटभरणाचे वेळी त्यांनी महाराजांस दिलेलें अभिवचन अक्षरशः पाळून परमार्थांत उत्तम साह्य केले. संसारांतल्या अडचणींस अगदीं दाद न देतां पतिसेवेंत चित्तवृत्ति आनंदित ठेविली व सद्विद्या-दानाच्या कर्तव्यांत सहवासांतल्या आश्रित मंडळीवर पुत्रवत् प्रेम करून त्यांचें सर्व प्रकारे संगोपन केलें.

मायबाईची मुद्रा अभ्यासांत गढलेली व दृष्टि नासाग्र असून त्यांची रहाणी अगदीं साधी असे. पूर्वीचे दिवस पालटून आतां महाराजांचें वैभव वाढलें





असतांही भारी वस्त्रप्रावरणांची किंवा दागदागिन्यांची इच्छा त्यांनी केव्हांच केली नाहीं. पतीची सेवा, त्यांस स्वहस्तें जेऊं वगैरे घालणे, त्यांजबरोबर गाणी म्हणूं लागणे, उच्च व मधुर स्वरांत ज्ञानेश्वरीचें नित्य प्रेमाने पठण करणे, महाराज रागावले असतांना अति शांत राहून त्यांच्या वृत्त्यनुकूल वागणे, मंडळीची दगदग सोसणे, भजन निरूपणादिकांत रात्रभर जागून मंडळी जेथल्या तेथें झोपेत पडली असतां त्यांच्या आंगावर पांघरूण घालून त्यांची काळजी घेणे, इत्यादि गोष्टींत ही पुण्यशील साध्वी अहोरात्र गढलेली असे.

सौ. मायबाईचें कंठमाधुर्य महाराजांच्या तोडीचें असून गाणीं वगैरे म्हणण्याच्या प्रसंगी त्यांचा आवाज महाराजांच्या आवाजांत मिळून जात असे व





हा त्यांचा गीतप्रसंग मोठा अपूर्व व बहारीचा वठून श्रोतृवृंदास त्या आनंदांत तल्लीन करीत असे. तेवेळी सर्वत्रांच्या मुखांतून 'फारच मंजूळ' असे उद्गार निघत असत.

आपल्या सहवासांतील स्त्रिया व पुरुष मंडळींत कोणाच्या हातून चुकी झाल्यास त्याला ताळ्यावर आणण्याची मायबाईत शक्ति होती व सर्वांस त्यांचा वचक असे. विशेषतः मंडळींतील स्त्रीवर्ग सन्मार्गगामी होण्यास त्यांचें आचरण फार उत्तेजक होतें.

***मायबाईना महावाक्योपदेश***

मायबाईच्या शिक्षणासंबंधाने महाराजांनी किती काळजी घेतली याविषयींचा उल्लेख मागें आला आहे. वेळोवेळीं त्यांच्या वृत्तींचें निरीक्षण करून सुधारणा





करण्याचा प्रयत्न करणे हें तर महाराजांचें ब्रीदच होते. गरोदर स्थितीत स्त्रियांच्या मानसिक विचारांचा परिणाम गर्भावर होत असतो.

यासंबंधाने सार्थ श्रीचरकसंहितेंत शारीरस्थानांत अध्याय २ श्लोक २३ मध्यें पुढील वचन आढळतें :- **''गर्भोपपत्तौ तु मनः स्त्रीणां यं जन्तुं व्रजेत् तत्सदृशं प्रसूते''** हें जाणून महाराजांनी तिला श्रीकृष्णमूर्तीचें ध्यान सांगितलें होते व कुऱ्हा येथें श्रीकृष्णजन्माष्टमीचे उत्सवप्रसंगी महावाक्योपदेश केला होता.

मुलगा झाल्यानंतर, पुत्राचे ठिकाणी आईचा मोह असला तर, **'या माता सा पुनर्भार्या'** या श्रुतीवचनाप्रमाणे तिला दुसरें जन्मीं त्याची पत्नी व्हावें लागतें, हें जाणून हरतऱ्हेने तिच्या चित्तांतला

पुत्रमोह महाराजांनी काढून टाकला होता व पुढें तिच्या और्ध्वदेहिक प्रसंगी तिला ज्ञानयोग्य शरीर प्राप्त होण्याचा संकल्प करून पिंड दिला. असो. याप्रमाणे मायबाईची इहपरलोकची यात्रा अत्यंत सफल झाली.

सौ. मायबाईवर महाराजांचा अत्यंत प्रेम होता. तोच पुढें शोकरूपाने परिणाम पावून जगन्नाथराय पंडितादि महात्म्यांच्या शोकाप्रमाणे 'लोकवत्तु लीलाकैवल्यम्' या न्यायाने त्यालाही एक प्रकारचें उदात्त व गंभीर स्वरूप प्राप्त झालें. ते महाराजांचे शोकपरिप्लुत काव्योद्गार येणेप्रमाणे आहेतः-

***(श्री. त्रिपुरवारलिखित चरित्रातून)***





# पत्नी-प्रेम-पराग

बालवयातील मातृवियोग आणि तारुण्यातील पत्नीवियोग यासारखे मोठे दुःख आणखी कोणतेही नाही. वयाच्या अगदी तारुण्यात महाराजांना पत्नी सौ. मनकर्णिका यांचा चिरवियोग झाला. त्यातून हे काव्य साकारले. या विरहगीताची कालिदासाने लिहिलेला **अजविलाप** व जगन्नाथाचा **करुणाविलास** यांचेशीच थोडीफार तुलना होऊ शकते.परंतु जगन्नाथ पंडित आणि कालिदास हे दोघेही फार मोठे कवी होते जरूर, पण संत नव्हते.त्यामुळे त्यांच्या काव्यातील कारुण्याला निराशेची झांकोळी आली आहे पण महाराजांच्या पत्नीप्रेमपरागात ''पुढील जन्मी घाली





मज माळ'' या वाक्याने त्यातील कारूण्यरस-कल्लोळाला पुनर्मीलनाच्या प्रकाशाची किनार लाभली आहे.

''मी अंध असून तुज सुदंरीकडून माझे काम करविले म्हणून रागावून तूं काय परंधाम सेवितेस? मला सोडून परपुरुष रामाला वरतेस? लहानशा अपराधाला कठोर शिक्षा देण्यासाठी तुझ्या कोमल ह्दयाला ही नवीन गुरुदीक्षा कोणी दिली?''

''मी गुलाब आहे. मला कांटे असणारच. मी तुला एवढीच विनवणी करतो की तूं आपल्या ह्दयात माझ्या रूपाने **''संकटकहि गुलाबफुल पाळी''** अगे, गुलाबाच्या पाकळ्या गळाल्यातर कोठले सौंदर्य आणि कोठला सुवास? म्हणून तूं विरहाग्नीने **'न पाकळ्या**





**गाळी'**. आपल्या ह्दयातून तरी मला घालवू नकोस.''

श्रीरामाचा सीतावियोग आणि महाराजांच्या पत्नीप्रेमपरागाची तुलना होऊ शकते. महाराज म्हणतात ''रामही जानकीचा शोध करतो आणि मी त्या रामचंद्राचा दास! मला कुठले वैराग्य असणार!'' अशा प्रकारची विनम्र जाणीवही महाराजांचे अंतःकरणात आहे.

संतसाहित्यात सहसा न सांपडणारे पत्नीप्रेम या महापुरुषाने आपल्या काव्यात साकार केले आहे, हे विशेष. कविकुलगुरू कालिदास व जगन्नाथ पंडित यांच्या विरहगीतांपेक्षा काही आगळेपण यांत निश्चितच आहे.

*– कृ. मा. घटाटे.*

*पत्नीप्रेमपराग*

*आर्यावृत्त*

**मणिकर्णिके प्रिये ग तुजवांचुनि**
**फार जीव तळमळतो ।**
**मज दीन चातकावर केव्हां**
**न कळे दयाजलद वळतो ॥१॥**
**अवघे विषय विसरलों**
**विद्याही मिळविली स्मरे ना गे ।**
**परि योगिं अनाहतसम मम हृदयीं**
**बोलणे तुझें जागे ॥२॥**
**लाजत मराळ होते तव गतिला**
**कुंभिनीवरी असतां ।**
**एवढि सुकुमार कशी एकट**
**चढलीस पूर्णपद रस्ता ॥३॥**





**मजविण आन न जाणे**
**ऐसी तव बुद्धि फार सरला गे ।**
**अवचित परि मज कैसें फसवुनि**
**पर पुरुष राम वरला गे ॥४॥**
**निर्दय कळलीस पुरी**
**एकट टाकुनि मला महावळसीं ।**
**गुप्त मनांत वसोनी स्वप्निं**
**वैरिणि अझूनियां छळिसी ॥५॥**
**कीं मी अंध असुनिही तुज**
**सुंदरीकरवि करविलें काम ।**
**त्या कोपें रुसुनीयां मज सोडुनि**
**सेविलें परं धाम ॥६॥**
**वारंवार तुझे घे नांव**
**वाटला म्हणोनि अपमान ।**
**पुन्हां न परि करिन असें**





**मजवरिंचा देइं सांडुनी मान ॥७॥**
**अल्प अशा अपराधा**
**प्राणसखे द्यावया महाशिक्षा ।**
**तव कोमळ हृदयाला कोणी दिधली**
**नवीन गुरुदीक्षा ॥८॥**
**देवी देवी म्हणुनी अक्षय वांछित**
**दयाचि तव होतो ।**
**शेवटि रुसलीस परी वैराग्याविण**
**असाचि भव होतो ॥९॥**
**रामहि जानकि शोधी, कोठुनि**
**मग मी अविरक्त तद्दास ।**
**यास्तव कांते त्वांही हृदयांतुनि**
**सांडिजे न मम आस ॥१०॥**
**यक्षनिरोपीं श्रमला घन व्हाया दूत**
**न घे मम नमना ।**





**यास्तव असशिल तेथें वराननें**
**पाठवीत मी स्वमना ॥११॥**
**परलोकीं तुज शक्ति जाणाया**
**म्हणुनि विनवि अळुमाळ ।**
**क्षमा करुनि अन्याया**
**पुढिले तरि जन्मिं घालि मज माळ ॥१२॥**
**विलासललिते हृद्‌वनीं सकंटकहि**
**परि गुलाब फुल पाळी ।**
**सौरभ मिळेल तुजची**
**जीवन सुकवूनि न पाकळ्या गाळीं ॥१३॥**

**×××**

तात्पर्य 'पाहे पां अनुरागें भजे । जे प्रियोत्तमें मानिजे । ते पतिहूनि काय न वानिजे । पतिव्रता ॥' या ज्ञानेश्वर महाराजांच्या वचनाप्रमाणे मायबाईची योग्यता होती. ......

(१७)

# प्रियप्रेमोन्मादः

(यष्टी १६-२६३ ते २६४ / संस्कृतरचना -पृ.१५२.१५३)

॥ श्रीज्ञानेश्वर माऊली समर्थ ॥

**शब्दो निरुद्धो बाष्पैर्वा निरुद्धे नयनेऽश्रुभिः ।**
**निरुद्धं कर्म मोहेनाऽलं प्रियनमस्कृतिः ॥१॥**
**अहो वह्निसुता गंगा संगता मेघसागरम् ।**
**शैत्यं त्यक्त्वा दीनमीनः महातापेन जीवति ॥२॥**
**चित्रं बत निरिच्छस्य गृहे कल्पतरुः स्थितः ।**
**कुहकात् वञ्चिता येन साभिलाषजना वृथा ॥३॥**
**माऽऽगच्छ मधुप त्वं मे हृतः सर्वो रसस्त्वया ।**
**सुसेवायां प्रभूतायां पुनर्मां पीडयिष्यसि ॥४॥**
**मयैव काञ्चनं लब्धं विश्वं चोरविवर्जितम् ।**
**स्वेच्छया तत्संस्करोमि कटकं वाथ कुंडलम् ॥५॥**



(१८)

**तदेव राज्यं त्यागार्हं न यस्मिन् दुःखिताः प्रजाः ।**
**यत्र नार्यो न शोचन्ति तदेकं शून्यमन्दिरम् ॥६॥**
**जयोऽस्माकं यदा जातः किं तदाऽऽगमनं तव ।**
**प्रशंसार्हं भवेन्नाथ दयालोर्दीनवञ्चनम् ॥७॥**
**किं तेऽथ दर्शनानन्दो दृष्टिरेव हृता त्वया ।**
**किं पीयूषप्रसादेन मृतिकैवल्यमानिनः ॥८॥**
**अहो मूकः श्रुतिं ब्रूते पण्डितो मौनमास्थितः ।**
**यः पश्यति स एवान्धो यो न पश्येत्स पश्यति ॥९॥**
**नैव जानामि संस्थाप्य;, ायमद्य स्यमन्तकः ।**
**अस्यैव चिन्तया भग्नं हृदयं मे सहस्त्रधा ॥१०॥**
**अन्यां याहि शिवं तेऽस्तु हा हा चञ्चल मुञ्च माम् ।**
**सुखेन वस भो स्वामिन् यत्र ते रमते मनः ॥११॥**



(१९)

**पितृघातकरी नाहं न चाहं व्यभिचारिणी ।**
**कथं साधनहीनायां नाथ मय्यनुकंपसे ॥१२॥**
**हृद्गदस्यातुरः प्राह रसचूर्णं महौषधम् ।**
**आरोग्यं विरहाल्हादः पुष्टिस्ते त्वय्यपस्मृतिः ॥१३॥**
**सर्वत्र विरहस्ते त्वं मूर्तिं दर्शय ते मम ।**
**व्यष्टिमूर्त्यालिंगने मे नाथ वांच्छा न विद्यते ॥१४॥**
**तवैक्यं त्वद्वियोगं वा हृदयं नैव मुञ्चति ।**
**भिन्नयोरुभयोर्योगो यत्नं तस्मात्परित्यज ॥१५॥**
**न चिन्ताराहुणा यावत् ग्रस्तो वदनचन्द्रमाः ।**
**तावन्न विद्यते पर्वं प्रियायासुसमर्पणे ॥१६॥**
**हा नाथ रमण प्रेष्ठ्, ासि दीनदयानिधे ।**
**दास्यास्ते कृपणाया मे पादयुग्मं प्रदर्शय ॥१७॥**

०००



(२०)

## रसग्रहण

*अनुवाद - कृष्ण माधव घटाटे.*

*( अद्‌भुत् कल्पनांच्या साह्याने विरोधालंकाराच्या चौकटीत भक्तिरसातील मनोज्ञ उन्मेष साकार करणारे उत्कृष्ट भक्तिकाव्य : प्रियप्रेमोन्माद )*

श्रीगुलाबरावमहाराजांचा अवघ्या सतरा श्लोकांचे हे संस्कृत काव्य आहे. सहस्राविधि आम्रफलांनी डवरलेल्या विशाल वृक्षाची माधुरी जशी परिपक्व झालेल्या एका लहानशा आम्रफलात भरली असते त्याप्रमाणे श्रीमहाराजांच्या मधुर तत्त्वज्ञानाची सर्व रसमाधुरी या ‘प्रियप्रेमोन्मादात’ एकवटली आहे.

‘उन्मादवन्नृत्यति लोकबाह्य’ लौकिकाच्या विपरीत भासणारी आत्यंतिक भक्तीतील प्रेमस्थिती कशी उन्मादासारखी असते, याचे भक्तिरसाने ओथंबलेले वर्णन वाचले की वाचकालाही वाटते की

या प्रेमाचा आस्वाद घेऊन आपल्यालाही या उन्मादाच्या आनंदात समरस होता आले तर आपल्या या नीरस जीवनाचे सार्थक होईल ! श्रीमहाराज स्वतःला श्रीकृष्णपत्नी- एवं पंचलतिका गोपिका म्हणत. ते आपल्या प्रियपती श्रीकृष्णाच्या ध्यानात स्वतःला विसरून जात. अशा प्रेमस्थितीत भक्ताचे सर्व विकार व मनात येणाऱ्या सर्व वृत्ती एका भगवंताच्याच साठी उत्पन्न होतात आणि त्यालाच अर्पण होत असतात. 'नमन' प्रेमाचे पहिले दर्शन घडविते. पण तेहि अत्यंत भावावेशामुळे घडून येत नाही असा आपला स्वानुभव श्रीमहाराज येथे सांगत आहेत- प्रेमाचे अष्टसात्विक भाव उत्कट झाल्यामुळे ज्ञानेश्वरकन्या आपल्या प्रिय श्रीकृष्णाला साधे नमन करण्याची इच्छा होऊनही तसे करू शकत नाही हे विलक्षणच होय. प्रेमाच्या





उत्कटतेची जात ही अशी वेगळी असते.

ती म्हणते - ''माझा कंठ सद्‌गदित झाल्यामुळे मी शब्द उच्चारू शकत नाही. आसवांच्या दाटीमुळे नेत्र तुला पाहू शकत नाहीत. हात जोडीन म्हटले तर मन मूर्च्छेत जाऊ लागल्यामुळे तेही होऊ शकत नाही. तेव्हा या उन्मादावस्थेत नमस्कार मी कसा करणार ! पुरे झाला नमस्कार !

- अलं प्रियनमस्कृतिः !!

महाराजांच्याच शब्दात-

**शब्दो निरुद्धो बाष्पैर्वा निरुद्धे नयनेऽश्रुभिः ।**
**निरुद्धं कर्म मोहेन अलं प्रियनमस्कृतिः ॥१॥....**

या भक्तिप्रेमाच्या सृष्टीतील अनुभव अगदी विचित्र आहेत. लौकिक सृष्टीतील अनुभवापेक्षा अगदी लोकबाह्य आहेत. येथील गंगा स्वर्गातून आकाशात





येते. तेथून हिमालयात येते. नंतर अधोगामी होऊन विशाल लवणसागराला मिळते. पण या उन्मादात सारेच उलट ! हृदयात उत्पन्न झालेली प्रेमगंगा विरहाच्या अग्नीतून जन्मली आणि खाली न वाहता, ऊर्ध्वगामी होऊन मेघसागराला म्हणजे मेघःश्याम श्रीकृष्णाला जाऊन मिळत आहे. त्या गंगेतील दीन झालेला भक्तरूपी मीन विरहाच्या उष्णरसात जीवंत राहत असतो आणि तृप्तीतील शीतलता मात्र त्याला नको असते, हेहि लोकविलक्षणच !! ही विरहिणी म्हणते-

**अहो वह्निसुता गंगा संगता मेघसागरम् ।**
**शैत्यं त्यक्त्वा दीनमीनः महातापेन जीवति ॥२॥**

हा अनुभव विलक्षण असला तरी विसंगत मात्र नाही. काव्यशास्त्राच्या उपपत्तीनुसार रसिकाचे





अन्तःकरण लाखेप्रमाणे शीत आणि कठीण असते. काव्यगत विभावानुभावादिकांनी तप्त होऊन ते वितळते आणि स्थायिभाव उद्दीपित होऊन रसाचा आविर्भाव होतो. आणि रसिक रसाचा आस्वाद घेतो. या ठिकाणी विभावानुभावादि सर्व तापक पदार्थ असतात. ते जर नसले तर अन्तःकरण तप्त होऊन द्रव पावू शकत नाही आणि रसनिष्पत्ति होऊ शकत नाही. भक्तांच्या अनुभवाला येणारा भक्तिरस हाही असाच असतो. निर्गुणरूपाने भक्ताचा भगवंताशी नित्यसंयोग असला तरी सगुणभगवंताच्या वियोगातील प्रेमाची उत्कटता मात्र कायम असते. हे विरहप्रेम भगवंताच्या ठिकाणी अखंड तैलधारावत् अर्पण होत असते. त्या प्रेमगंगेतील मासा म्हणजे भक्त. जर १दयातील हा विरहाग्नी शीतल झाला तर अन्तःकरण

कठीण होऊन रसच उत्पन्न होणार नाही आणि त्यातील भक्तरूपी मासा जीवंतच राहू शकणार नाही!

या प्रेमात भक्तच लोकविपरीत वागतो असे नाही तर भगवंतही तसाच अलौकिक वागतो.

महाराज म्हणतात– ''हे श्रीकृष्णा, तुझ्या प्रेमाने झालेला हा उन्माद अगदी लोकबाह्य आहे. बरे, माझे एक असो, पण तूं तरी सरळ वागावास ना, पण तूंही तसाच'' याचे वर्णन महाराज करतात-

**चित्रं बत निरिच्छस्य गृहे कल्पतरुः स्थितः ।**
**कुहकात् वंचिता येन साभिलाषजना वृथा ॥३॥**

तूं सकलांच्या कामना पूर्ण करणारा कल्पतरु आहेस ना. तर ज्यांना कामना आहेत त्यांच्या घरी तूं राहायला हवे; पण निरिच्छ अशा भक्तांच्या घरात तूं कल्पतरू होऊन बसलास. त्यांना





तुझ्या कल्पवृक्षाचा काय उपयोग? बरे, जर कोणी आपले मनोरथ पूर्ण करण्यासाठी तुजपाशी आला तर **'तस्य सर्वं हराम्यहम्'** असे म्हणून तूं त्याचे सर्वस्व हरण करतोस. आपली भक्ती देऊन त्याच्या सर्व वासनाच नाहीशा करतोस. तूं कल्पतरु असून स्वतःचा उपयोग त्यांनाही होऊ देत नाहीस. म्हणजे साभिलाषजनांना कल्पतरूच्या मिषाने तूंच फसवितोस ना ! मला उन्माद होऊन मी लोकबाह्य वागतो हे खरे असले तरी तूंही कमी नाहीस !''

''तूं लोकांची खुशाल वंचना करतोस. मलाही तूं केव्हा आणि कसा फसविशील याचा काय नेम? तर मग, माझ्याजवळ मुळी येऊच नकोस. माझ्या हृदयकमळातील सर्व मधुपराग तूं पिऊन टाकला आहेस. मी लौकिकाची चाड न धरता तुझी उत्तम





सेवा करावी आणि तूं मला पुनः पुनः त्रास द्यावा ! मी सर्व प्रेमरस तुला अर्पण करावा तरी देखील तुझी तृप्ती होऊ नये, विरहव्यथा देऊन मला सतत तूं पीडा द्यावीस ! यावर उपाय एकच. आता माझ्याजवळ तूं मुळीच येऊ नकोस–

**माऽऽगच्छ मधुप त्वं मे हृतः सर्वो रसस्त्वया ।**
**सुसेवायां प्रभूतायां पुनर्मां पीडयिष्यसि ॥४॥**

अतृप्त अन्तःकरण सतत ओढ घेत असतांहि **'माऽऽगच्छ'** -तूं येऊ नकोस, असे श्रीकृष्णाला सांगणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या ही कुलीन कन्येचा हा मनोज्ञ प्रेमकलह !

(श्रीमहाराजांच्या या प्रत्येक श्लोकात प्रेमोन्मादाच्या वेगवेगळ्या अर्थच्छटा उमटल्या आहेत. त्यातील संगति आणि विसंगति दोन्हीही वेधक आहेत)





**मयैव काञ्चनं लब्धं विश्वं चोरविवर्जितम् ।**
**स्वेच्छया तत्संस्करोमि कटकं वाऽथ कुंडलम् ॥५॥**

मला माझ्याच ठिकाणी सुवर्णाचा मोठा लाभ झालेला आहे. आणि त्यातही आनंदाची गोष्ट अशी की ते आता कधीहि नाहीसे होणे नाही. आजपावेतो आनंदाचा शोध घेत माझे मन बाह्य विषयावर धावत होते. परंतु व्यतिरेकानुभवामुळे तो आनंद माझ्याच ठिकाणी आहे हे कळले हीच सद्चिदानंदाची प्राप्ती होय हे आत्मरूपी सुवर्ण कोणी चोरून नेणेही आता शक्य नाही. 'सर्वं खलु इदं ब्रह्माचा अन्वयाचा अनुभव आल्यामुळे सर्व विश्वात मीच एकटा आत्मस्वरूपाने ओतप्रत भरून गेलो आहे. त्यामुळे या साऱ्या विश्वात माझे सुवर्ण चोरून नेणारा कोणी चोरच शिल्लक नाही. अशा तऱ्हेने अन्वयव्यतिरेकपूर्वक सद्चिदानंद

स्वरूपाची मला प्राप्ती झाली आणि मी सुवर्ण संपन्न झालो आहे.

आपल्याजवळ असलेल्या सोन्याच्या लगडीला कोणता तरी आकार राहणारच ! म्हणून आपण आपल्या आवडीप्रमाणे एखादा अलंकार कटक कुंडले वगैरे पैकी, सोनाराकडून करवून आपली आवड पूर्ण करतो. त्याप्रमाणे जगाची ही सर्व नामरूपे परब्रह्माचीच असली तरी त्या भिन्न भिन्न नामरूपांऐवजी मी मला प्रिय असलेल्या सगुण साकार श्रीकृष्णाचीच रूपे मी पाहणार ! आपल्या हृदयामध्ये श्रीहरीचा अनुभव घेतल्यानंतर बाहेर मिथ्या जगाच्या नामरूपांचा अनुभव मी आतां कां घ्यावा? बाहेरही प्रिय श्रीहरीच्या सगुणसाकार विग्रहाचाच अनुभव मी घेणार !





**तदेव राज्यं त्यागर्हं न यस्मिन्दुःखिताः प्रजाः ।**
**यत्र नार्यो न शोचन्ति तदेकं शून्यमन्दिरम् ॥६॥**

ज्या राज्यातील प्रजा दुःखी आहे ज्या घरात स्त्रिया दुःखी असतात त्या राज्यात आणि त्या घरातही राहू नये. पण भक्तिप्रेमाच्या राज्यात मात्र सर्व नियम विलक्षणच!

ही ज्ञानेश्वरकन्या सांगते की, ''ज्या राज्यातील प्रजा परमेश्वर प्राप्तीकरता व्याकुळ नसते त्या देशात राहून आपले काय भले होणार ! तो देश सोडून द्यावा. ज्या घरात श्रीकृष्णांच्या विरहप्रेमाने कातर झालेल्या स्त्रिया नाहीत ते घर शून्य आहे, देव नसलेले ते शून्यमंदिर होय ! त्यापासून दूर जाणेच बरे !

**''माझिया जातीचे मज भेटो कोणी । आवडीची घणी**





**फेडावया ॥''** ज्या ठिकाणी भक्तजन वास करतात त्या पवित्र ठिकाणी जाऊन राहावे आणि त्यांच्या पावन सहवासात भावभक्तीची धणी फेडून घ्यावी !

हे श्रीकृष्णा, आम्हाला आत्मानुभव आला, ज्ञान प्राप्त झाले आणि आमचा जय झाला. तूं आणि मी एकच आहो हे कळले. आतां तूं येऊन काय उपकार केलास ! आता तूं जातो म्हटलेस तरी जाऊ शकत नाहीस-

**जयोस्माकं यदा जातः कि तदाऽऽगमनं तव ।**
**प्रशंसार्हं भवेन्नाथ दयालोर्दीनवंचनम् ॥४॥**

तुझ्या दयाळुपणाच्या कीर्तीमुळे आमची फसगत झाली. जेव्हा आम्ही संसाराच्या भीतीने भयभीत झालो तेव्हा तूं येऊन, दर्शन देऊन आमची भीती दूर करावयास हवी होती. तुला दीनांवर दया





करणारा कां म्हणतात, हेच समजत नाही. कारण आम्ही दीन असताना तूं आला नाहीस आणि आमची वंचना केलीस. आणि आता आम्ही जिंकलो, आमचे दैन्य संपले तेव्हा तूं आलास. हे दीनदयाळा, तूं केलेल्या या दीनवंचनेची जेवढी प्रशंसा करावी तेवढी कमीच होईल !

**किं तेऽथ दर्शनानन्दो दृष्टिरेव हृता त्वया ।**
**किं पीयूषप्रसादेन मृतैकैवल्यमानिनः ॥८॥**

आम्हाला द्वैतदृष्टी होती तेव्हा तुझ्या दर्शनाचा आनंद भोगता आला असता. पण आता मला सर्वत्र माझे आत्मस्वरूपच अनुभवायला येत आहे. जिच्या योगे दुसरी वस्तू पाहावयाची असते ती दृष्टीच तूं हरण केलीस आणि आता दर्शन देऊन तूं हिणवतोस काय !

जे मरणालाच मोक्ष समजतात किंवा जे मरायचीच इच्छा करतात त्यांना अमृताचा प्रसाद मिळूनही काय उपयोग? त्याचप्रमाणे, मला जेव्हा तुझ्या दर्शनाची इच्छा होती तेव्हा दर्शन दिले नाही आणि आता गरज संपली तेव्हा मात्र तूं दयाळुपणाचा आव आणतोस. हाच ना तुझा दीनदयाळूपणा?

**अहो मूकः श्रुतिं ब्रूते, पण्डितो मौनमास्थितः ।**
**यः पश्यति स एवान्धो, यो न पश्येत्स पश्यति ॥९॥**

ज्याला आत्मानुभव नाही तो आत्मज्ञानाच्या गोष्टी सांगतो. सांगण्यासारखे काही नसल्यामुळे जो मूकवत् आहे तो वेदान्ताची अर्थहीन अशी बडबड करतो. आणि जो खरोखरच अनुभवी पंडित आहे तो मात्र हे आत्मस्वरूप शब्दाने व्यक्त करता येत नाही असा विचार करून आत्मस्वरूपाविषयी एक





अवाक्षरही बोलत नाही. 'नेति नेति' समजून मौन धारण करतो.

जो हे सर्व जगरूपाने पाहतो तोच खरा अंध होय. कारण, जगाचे खरे स्वरूप- परब्रह्म त्याला दिसत नाही. खरी वस्तू न दिसता भलतीच वस्तू दिसणे ही अंधता नव्हे काय? आणि –

सर्वत्र आत्म्याचाच प्रत्यय आल्यामुळे जो स्वभिन्न अशा जगताला पाहूंच शकत नाही; त्याने जगाला न पाहिले तरी त्याची आत्मदृष्टी अखंड कायम असते म्हणून तोच खरा पाहणारा !

**नैव जानामि संस्थाप्यः क्वायमद्य स्यमन्तकः ।**
**अस्यैव चिन्तया भग्नं हृदयं मे सहस्त्रधा ॥१०॥**

निर्गुण आत्मा श्रीहरीच्या रूपाने साकार होऊन मला प्राप्त झाला. पण हा लीलाविग्रह कुठे





ठेवावा हेच मला कळेनासे झाले आहे. केवळ व्यतिरेकाने एकदेशी श्रीहरी प्राप्त झाला असता तर त्याला हृदयसिंहासनावर बसविले असते. पण तोच श्रीहरी सर्व चराचरात भरलेला आहे असा व्यापक अनुभव आल्यामुळे त्याला बसविण्यासाठी जागाच सापडत नाही. प्रियकराच्या निवासासाठी हृत्कमलरूपी जे कोमल सिंहासन जवळ होते तेच मुळी या चिंतेमुळे सहस्त्रशः विदीर्ण झाले आहे.

आजपर्यंत जन्मजन्मांतरी अनंत कष्ट करून हा स्यमंतक मण्यासारखा अमोल ठेवा हस्तगत झाला. पण आता मात्र असा चमत्कारिक प्रसंग आला आहे की प्रियकराची पूर्णतः प्राप्ती होऊनही त्याला जपून ठेवण्यासाठी जागाच मुळी उरली नाही. या चिंतेमुळे जे एकमात्र स्थान होते ते हृदयच नष्ट झाले. काय





हा दारुण प्रसंग !

**''हृदयं सहस्त्रधा भग्नम्''** !!

मनुष्य 'स्व'स्थ नसला म्हणजे पुष्कळदा नेमके काय हो आहे ते सांगता येत नाही. परंतु व्यग्रता वाढतच असते. शेवटी आपले मनोगत नीट सांगता न आल्यामुळे तो व्याकुळ होऊन जातो. तसाच काहीसा प्रकार इथे आढळतो. भगवत्प्रेमाचे वेड लागलेल्या पञ्चलतिकेला (श्रीगुलाबराव महाराज) प्रतिक्षणी भेट देऊन निघून जाणाऱ्या मनातील विविध भावनांचे अंकन करणे कठीण होत आहे. भगवत्प्रेमोन्मादाच्या या अत्यंत सूक्ष्म छटा वेचता वेचता अगदी व्याकुळ होऊन या काव्याच्या शेवटी **'पादयुग्मं प्रदर्शय'** म्हणून ही ज्ञानेशांची कन्या श्रीमहाराज थबकून गेली आहे.

(३७)

**अन्यां याहि शिवं तेऽस्तु हा हा चंचल मुंच माम् ।**
**सुखेन वस भो स्वामिन् यत्र ते रमते मनः ॥११॥**

हे श्रीकृष्णा, तूं अतिशय चंचल आहेस. एका ठिकाणी तुला बरे वाटत नाही ना? मग मला सोडून दे. दुसऱ्या गोपीकडे जा. तुझे मन रमेल तेथे तूं सुखाने रहा. तुझे मंगल होवो. तूं माझ्याजवळच रहा असा मुळीच आग्रह नाही.

या ठिकाणी या आंधळ्या गौळिणीच्या मनात जी एक स्वसुखाची वृत्ति होती तीहि तिने श्रीकृष्णालाच अर्पण केली आहे. 'श्रीकृष्ण माझ्याजवळच राहिला तर 'मला' आनंद होईल खरा; पण जर त्याच्या मनात दुसऱ्या गोपीकडे जाण्याची इच्छा असेल तर मी जरी त्याची कितीहि सेवा केली तरी त्याने 'त्याला' सुख होणार नाही. 'मला' सुख होईल. त्याच्या सुखात मी विघ्नरूप होईन, माझ्या प्रियकराच्या



(३८)

आनंदात उणेपणा येईल' म्हणून ही पंचलतिका गोपी म्हणते **'अन्यां याहि !'**

या संदर्भात एका पतिव्रतेची कथा आठवते. तिचा पती दुर्व्यसनी होता. वेश्येशिवाय त्याला करमत नसे. पण एकदा तो जर्जर होऊन जाऊ शकला नाही म्हणून तो व्याकुळ झाला. त्याच्या मनाची अस्वस्थता पाहून या पतिव्रतेला राहवेना. तिने त्याला कारण विचारले. पण लज्जेमुळे तो सांगेना. शेवटी आग्रहामुळे त्याला सांगावे लागले. तेव्हा तिला आनंद झाला. ती म्हणाली 'एवढेच ना? मी तुम्हाला माझ्या खांद्यावर घेऊन चलते.' आणि ती पतीला घेऊन समाधानाने वेश्येकडे निघाली. त्याच वेळी मांडव्यऋषीना सुळावर चढविले होते. वाटेने चालता चालता रात्रीच्या अंधारात न दिसल्यामुळे तिचा



(३९)

त्यांना धक्का लागला. ते व्याकूळ झाले. त्यांनी शाप दिला – 'तूं ज्याच्या आनंदासाठी जात आहेस त्याचा सूर्योदय होताच मृत्यू होईल.' तिनेही आत्मविश्वासाने सांगितले 'उद्या सूर्योदयच होणार नाही' आणि पतिव्रतेच्या प्रभावामुळे तसेच झाले.

या कथेत 'तत्सुखसुखित्वाच्या उत्कट प्रेमाची मानसिकता वर्णीली आहे. तीच भावना श्रीमहाराजांनी **'अन्यां याहि'** या ओळीने व्यक्त केली आहे.

जेव्हा सुख घेणारा व सुख देणारा असे दोघे असतात त्यावेळी सुख घेणाऱ्याच्या वृत्तीत भोक्तृत्व स्फुरते. पण भक्त मात्र सर्व सुख भगवंताला समर्पण करीत असतात. भगवंताच्या सुखानेच ते सुखी होत असतात–सुखरूप होत असतात. त्यांचे ठिकाणी 'मी सुखी झाली' ही जाणीवच स्फुरत नाही तर 'भगवान सुखी झाला' अशी वृत्ति स्फुरते; आणि



(४०)

भक्त भगवदाकार होऊन राहतात.(हीच वृत्तिव्याप्ति होय) हीच तत्सुखसुखित्वाची जाणीवनेणीव रहित आनंदाची निर्विकल्प भक्तिस्थिति होय. गोकुळातून मथुरेला जेव्हा भगवान् गेले तेव्हा गोपिकांनी विलाप केला. त्यावेळी त्याही हेच म्हणाल्या **''सौख्यं तस्य हृदि चेत् तत्र वासं करोतु''** हीच तत्सुखसुखित्वाची अर्पणरूपा प्रेमभक्ती येथेही स्पष्ट दिसते.

**पितृघातकरी नाहं न चाहं व्यभिचारिणी ।**
**कथं साधनहीनायां नाथ मय्यनुकंपसे ॥१२॥**

प्रल्हादाने पित्याचा घात करून तुझी प्राप्ति करून घेतली, तशी मी पितृघात करणारी नाही. गोपिकांनी जारबुद्धीने तुला मिळविले. पण मला तुझ्याशिवाय दुसरा पतीच नाही त्यामुळे मी व्यभिचारिणीहि नाही. ही दोन्ही साधने माझ्याजवळ

नाहीत. तेव्हा तूं माझ्यावर कशी कृपा करणार?

आणखी असे की ही दोन्ही साधने मला प्राप्त होणे देखील कधी शक्य नाही. कारण माझे पिता साक्षात् ज्ञानेश्वर आहेत. हिरण्यकशिपूने तुला विरोध केला पण माझ्या तातांनी तर स्वतः कन्यादान करून मला तुझ्या स्वाधीन केले आहे. तेव्हां मी पित्याचाच घात करीन काय? तुझ्या दृष्टीने अशी मी साधनहीन आहे तेव्हा तूं मजवर अनुकंपा कशी करशील !

**हृद्‌गदस्यातुरः प्राह रसचूर्णं महौषधम् ।**
**आरोग्यं विरहाह्लादः पुष्टिस्ते त्वय्यपस्मृतिः ॥१३॥**

चिंतारूपी रोगाने माझे हृदय आतुर झाले आहे. हृद्रोगाला आयुर्वेदात जसे रसचूर्ण हे औषध





आहे तसे येथे भक्तिरस हेच या चिंतेचे औषध आहे. भक्तिरसाच्या उद्भवानंतर मला विरहातही स्वानंदाचीच प्राप्ति होईल. म्हणजे तुझ्या संयोगातही वियोगातील प्रेमाची ओढ तेवढीच कायम राहील अशी प्रेमाची उत्कटता- म्हणजे प्रेमानंदात एकरूप होऊन राहणे होय आणि हाच विरहभक्तीतील आल्हाद म्हणजे खरेखुरे आरोग्य होय. *(विरहे दर्शनोत्कंठा संयोगे विश्लेषभीरुता)*

स्मृती म्हणजे यथार्थ ज्ञानाची आठवण आणि अपस्मृती म्हणजे वस्तुस्थितीच्या उलट कांहीतरी वेगळेच आहे- असे वाटणे. या विरहप्रेमात भगवंताचा विरह आहे, किंवा विरह होईल की काय, अशी नसती शंका येऊन भक्ताच्या प्रेमाची ओढ भगवंताकडे लागून राहणे. म्हणजे संयोग असून





वियोग-इव प्रेमस्थिती होणे हीच **अपस्मृती** !

ही अपस्मृती प्रेमाची पुष्टी करणारी आहे कारण केवळ संयोग असला तर धन्यतेचा अभिमान होऊन प्रेमाचे सुख कमी होते. *(गोपिकांना ''धन्योऽस्मि चा अभिमान होऊन भगवान् अंतर्धान पावले त्याप्रमाणे)* वियोगोपलालन असले म्हणजे प्रेमाची ओढ कमी होतच नाही, उलट ते प्रेम सारखे सर्व वृत्तींनी सहस्रशः सगुण साकार भगवंताकडे धांव घेत असते.

वात्सल्य माधुर्य वगैरेपैकी कोणत्या तरी एका वृत्तीने भगवंताचा संयोग होतो पण तेथे वियोगोपलालन सुरू झाले म्हणजे बाकीच्या सर्व वृत्तींनी चढते वाढते प्रेमच उचंबळून येते. म्हणून या अपस्मृतीमुळे प्रेमाची अधिकाधिक पुष्टी होत राहते.

**सर्वत्र विरहस्ते त्वं मूर्तिं दर्शय ते मम ।**





**व्यष्टिमूर्त्यालिंगने मे नाथ वांछा न विद्यते ॥१४॥**

मला तुझा विरह सोसवत नाही. हा विरह सर्वत्र आहे. आतही विरहाची आग आणि बाहेरही तू मला दिसत नाहीस. हे मला सोसवत नाही आता तूं दर्शन दे. पण तुझी सगुण मूर्ति व्यष्टिरूपाने मला नको तर समष्टीरूपाने तुझे सगुणरूप मला दाखव. मला तुझ्या एकदेशीय मूर्तीच्या आलिंगनाची मुळीच इच्छा नाही. हृदयाच्या आत आणि बाहेरही तूंच सगुणसाकार हो आणि मला आलिंगन दे.

पूर्वी अर्जुनाला जे विश्वरूप दाखविले ते विश्वाची उत्पत्ति, पालन व संहार करणारे भगवंताचे स्वरूप तटस्थ लक्षणात्मक होते. त्यामुळे त्यांत अर्जुनाला भीती देखील वाटली.[1] — पण या ठिकाणी मात्र आलिंगन देण्यासाठी प्रेमसाकार स्वरूप

श्रीमहाराजांना हवे आहे. सगुण साक्षात्काराच्या **व्यतिरेक** अनुभवात हृदयदेशाच्या ठिकाणी प्रथम साक्षात्कार होतो. नंतर **अन्वयात** बाहेरही सर्व नामरूपांनी श्रीकृष्णरूपच नटले आहे असा अनुभव येतो. आणि **पुनर्व्यतिरेकात** मात्र एका श्रीकृष्णावाचून दुसरा अनुभवच येत नाही, हीच पुनर्व्यतिरेकाची स्थिती श्रीमहाराजांनी या श्लोकात दर्शविली आहे. हेच स्वरूपलक्षणात्मक[2] परमप्रेमरूप भक्तिलक्षण येथे अभिप्रेत आहे. गोपिकांना अनुभूत असलेली सर्वव्यापक श्रीकृष्णरूपाच्या आलिंगनाची इच्छा येथे व्यक्त होते.[3]

१ – तेवि जव नुमटे श्रीहरिभजन । जंव स्वरूपसाक्षात्कार नव्हे गहन । तोंचि हे तटस्थ लक्षण । भयदाते ॥५७॥ (भक्तिपदतीर्थामृत अ. २)

२ – मग स्वतंत्र षड्गुणैश्वर्यसपन्न । साकार





अखंड सच्चिदानंदधन । हे तत्पदलक्ष्यांशस्वरूप लक्षण । प्रत्यया येत तत्कृपे ॥५९॥ (भक्ति.अ.२)

३ – मग विषय जे जे दिसती । ते ते साकार श्रीपति । ही व्रजगोपींची प्रतीति । वाखाणिली ॥६०॥ (भक्ति.अ.२)

**तवैक्यं त्वद्वियोगं वा हृदयं नैव मुंचति ।**
**भिन्नयोरुभयोर्योगे यत्नं तस्मात्परित्यज ॥१५॥**

तुझे व माझे अत्यंत ऐक्य आहे हा अपरोक्ष अनुभव मला आहे. ही अद्वैतस्थिती कधीच नष्ट होणे शक्य नाही. अशाप्रकारे निर्गुणरूपाने आपले ऐक्य आहे.

बरे, तुझ्या सगुणरूपाचे दर्शन झाल्यानंतर देखील विरहात असलेली माझ्या अन्तःकरणाची ओढ तशीच कायम आहे. **'विरहे दर्शनोत्कंठा संयोगे विश्लेषभीरुता'** आहे. श्रीतुकाराममहाराज म्हणतात





तसे **'आता दृष्टिपुढे ऐसाचि तूं राही । जो मी तुज पाही पांडुरंगा'** यातील द्वितीय चरणात संयोगावस्था आणि पहिल्या चरणात विश्लेषभरुता यांचे वर्णन आहे. आणि या दोन्ही अवस्था पांडुरंगाचे रूप पुढे असताना म्हणजे संयोगात एकाच वेळी तुकाराममहाराज अनुभवत आहेत.

एक गोपी रासपरिश्रमानंतर भगवंताच्या मांडीवर विसावली. तिला झोप लागली. पण त्या निद्रित अवस्थेतही तिच्या मुखातून 'हा श्याम, हा श्याम' असे विरहप्रेमातील उत्कटतेने भरलेले आर्त उद्गार निघत आहेत असे वर्णन आहे.

या दोन्ही उदाहरणाप्रमाणे याही श्लोकात संयोगात असलेली विरहप्रेमाची स्थिती महाराजांनी रेखाटली आहे 'हे कृष्णा, तुझा संयोग आणि वियोग





हे परस्पर विरोधी असूनही माझ्या हृदयात एकाच ठिकाणी गुण्यागोविंदाने नांदतात. हे किती आश्चर्य आहे. माझ्या हृदयाची मात्र या विरहानलाने राखरांगोळी होत आहे. हा विरहव्यथेचा हृद्रोग शांत करण्याची तुझी इच्छा असेल पण ते कधीच शक्य नाही. कारण एकतर तूं माझ्याशी असलेला संबंध तोडून जाण्याचा विचार केलास तर तुझा खराखुरा विरहच मला मिळणार ना? तो तर आत्ताही आहेच. बरे जर विरह नाहीसा करतो म्हटलेस तर तो संयोगच होईल. याचा अर्थ असा की, तूं विरहदुःखातून मला कधीच सोडवू शकत नाहीस आणि संयोगाचाही नाश करू शकत नाहीस. अशा या लोकविलक्षण हृदयरोगाची चिकित्सा करण्याचा प्रयत्न तूं सोडून दे.'

असे हे संयोगेऽपि वियोगोपलालनाचे परमप्रेम मिळूनही या आंधळ्या गौळणीला आपल्या प्रेमाची पूर्णता झाली असे वाटतच नाही. भक्तीतील सर्वोच्च स्थिती म्हणजे हीच होय. पण यात भोक्तृत्व न स्फुरल्यामुळे पूर्णताच वाटत नाही. आपले प्रेम कमी आहे असेच वाटत असते. त्यामुळे भक्ताचे अन्तःकरण अगदी सारखे तैलधारावत् भगवंताकडे ओढ घेत असते. पण मध्येच आपल्या प्रेमात कमतरता आहे अशी जाणीव झाली की तिला आपल्या प्राणांचाही कंटाळा येतो. प्राण नकोसे होतात. तेही भगवच्चरणी लीन करावेसे वाटतात. तिला प्रेमाच्या दहा दशा आठवतात.- **"चिन्तात्र जागरोद्वेगो तानवं मलिनांगता प्रलापो व्याधिरुन्मादो मोहो मृत्युर्दशा दश ॥"** चिंता ही पहिली आणि मृत्यू ही शेवटची दहावी दशा हे





तिला आठवते. ही दहावी दशा आपल्याला प्राप्त व्हावी म्हणून ती प्राणांचे दान देण्यास निघते. पण तिला पुनः वाटते ही तर प्रेमाची अंतिम दशा आहे, आणि मला तर प्रेमाची पहिली दशा 'चिंता' ती देखील प्राप्त झाली नाही. असे मनात येताच तिच्या मुखातून अत्यंत करुणोद्गार निघतात-

**न चिंता राहुणा यावत् ग्रस्तो वदनचंद्रमाः ।**
**तावन्नं विद्यते पर्वं प्रियायासुसमर्पणे ॥१६॥**
**हा नाथ रमण प्रेष्ठ क्वासि दीनदयानिधे ।**
**दास्यास्ते कृपणाया मे पादयुग्मं प्रदर्शय ॥१७॥**

जोपर्यंत राहू चंद्राला ग्रास करीत नाही तोपर्यंत दान देण्यासाठी पर्वकाल प्राप्त होत नाही. तद्वत् जोपर्यंत चिंतेने मुखचंद्र सुकून काळवंडत नाही तोपर्यंत प्रिकरासाठी प्राणदान करण्याचा





पुण्यकारक समय प्राप्त होत नाही. मला माझे असु म्हणजे प्राण श्रीकृष्णाच्या चरणांवर अर्पण करायचे आहेत परंतु चिंतेने मी व्याकुळ झालेली नाही. प्रेमाची ही पहिलीहि दशा मला प्राप्त झाली नाही तेव्हा प्राणार्पणाची दहावी दशा मला कशी मिळणार ! मी अगदी साधनहीन आहे तेव्हा केवळ प्रार्थना करते.

हे श्रीकृष्णा, तूं माझा स्वामी आहेस. तूंच मला रमविणारा रमण आहेस. तूं प्रियतम आहेस. इतकेच नव्हे तर दीनांवर दया करणारा करुणासागर आहेस. माझ्या अन्तःकरणातील संपूर्ण प्रेम अर्पण करण्याची क्षमता माझे अंगी नाही. मी तुला प्रेम देताना अत्यंत कृपणता दाखविली आहे. पण तूं या कृपणतेकडे दुर्लक्ष कर. ही साधनहीन व प्रेमशून्य दासी असली तरी ही 'तुझी आहे' हे लक्षात घे आणि तुझ्या कोमल पाउलांचे मला दर्शन दे.

॥ हा मराठी अनुवाद श्रीसद्गुरुचरणी समर्पण असो ॥

०००